
Process Safety Beacon
http://www.aiche.org/CCPS/Publications/Beacon/index.aspx
उत्पादन क्षेत्रातील व्यक्तिंसाठी संदेश

CCPS च्या समर्थकांकडून प्रायोजित

# निष्क्रीय सुरक्षा उपकरणे

जूलै २०१०



एप्रिल – लांब बोल्ट असलेल्या फ्लँजविरहीत व्हॉल्व्हवरील निरोधक वेष्टन



मे – पाइप ब्रीजला आधार देणाऱ्या स्तंभाचे खराब झालेले अग्निरोधन



जून – समावेशक भित्तींमधील एक छिद्र

प्रक्रीया सुरक्षा दीपस्तंभाच्या एप्रिल, मे, आणि जून २०१० या तीनही आवृत्त्यांमध्ये काय साधर्म्य होते हे आपण सांगू शकाल? या सर्वांमध्ये अशा सुरक्षा उपकरणांची चर्चा आपण केली होती ज्यांची गणना **निष्क्रीय** म्हणून केली जाऊ शकते. निष्क्रीय सुरक्षा उपकरणांना असुरक्षित परिस्थितीचा शोध घ्यावा लागत नाही की आपले बचावात्मक सुरक्षकाचे काम करावे लागत नाही. त्यांच्यामध्ये सेंन्सर्स तसेच फिरणारे भाग नसतात. ते आपले काम त्यांच्या रचनेमुळेच करतात – उदाहरणार्थ निरोधक वेष्टनाचे किंवा अग्निरोधनाचे निरोधक गुणधर्म व जाडी किंवा समावेशक भित्तींची उंची आणि बांधकाम साहित्याची अभेद्यता.

खाली अशाच काही निष्क्रीय सुरक्षा उपकरणांची उदाहरणे दिली आहेत जी आपल्या संयंत्रात असू शकतातः विषारी पदार्थांच्या साठवण्याची समावेशक इमारती, स्फोट प्रतिरोधित नियंत्रण कक्ष किंवा अन्य इमारती, जैविक पेरॉक्साइड सारखे संभवतः अस्थिर पदार्थ साठवण्याच्या स्फोटरोधक इमारती, आग किंवा विस्फोटक प्रतिबंधके, आग लागल्यास स्टोरेज टाकी उष्णतेच्या संपर्कात येण्यापासून वाचवण्याचे वेष्टन, (आगीने वेढलेली टाकीतील दाब प्रमाणाबाहेर वाढण्यापासून रोखणाऱ्या रिलीफ व्हॉल्व्हची मापे ठरवण्याच्या मानकांमध्ये श्रेय गुण धरतात).

## आपणास हे माहीत आहे का?

- निष्क्रीय सुरक्षा उपकरणांमधे फिरते भाग किंवा सेंन्सर्स नसतीलही तरीही त्यांची नियमित तपासणी आणि देखभाल आवश्यक आहे. बीकॉनच्या यापूर्वीच्या तीन अंकांमधे दर्शविल्याप्रमाणे संरक्षक वेष्टणे उपकरणावरून काढले जाऊ शकतात, खराब होऊ शकतात किंवा त्यांचे नुकसान होऊ शकते, अग्निरोधक वेष्टन खराब होऊ किंवा काढले जाऊ शकते; समावेशक भित्तींना छिद्र असू शकते आणि इतर प्रकारची निष्क्रीय सुरक्षा उपकरणांमधे खराब होऊ शकतात किंवा त्यांचे नुकसान होऊ शकते.
- निष्क्रीय सुरक्षा उपकरणांचे आणि संयंत्राच्या सुरक्षेतील त्यांचे महत्व यांचे विस्मरण होणे स्वाभाविक आहे कारण ती तुमच्या संयंत्राच्या पार्श्वभूमीचा एक भागच असतात जी तुमच्या नित्य पहाण्यात असतात आणि त्याच्या परिस्थितीकडे तुमचे दुर्लक्ष होते.

## आपण काय करु शकता ?

- आपल्या खात्यातील निष्क्रीय सुरक्षा उपकरणांची तसेच त्याचे सुरक्षेतील कार्य यांची माहिती करून घ्या.
- आपल्या संयंत्रातील निष्क्रीय सुरक्षा उपकरणांच्या देखभालीसाठी कोणते उपाय केले जावेत व ही देखभालीची कामें नियमित केली जात असल्याची खात्री करा. ही देखभालीची कामें करण्यास जबाबदार व्यक्तिना आवाहन करा की त्यांनी आवश्यक देखभालीच्या कामांची सविस्तर माहिती द्यावी.
- आपल्या संयंत्रातील निष्क्रीय सुरक्षा उपकरणांच्या होणारी हानी ओळखण्यास शिका जेणेकरून आपण संबंधित लोकांना सूचित करून दुरूस्ती करून घेवू शकता.
- अधून–मधून निष्क्रीय सुरक्षा उपकरणांची तपासणी आपल्या संयंत्राच्या नियमित सुरक्षा तपासणीमध्ये अंतर्भूत करा.

**आपल्या संयंत्रामध्ये कोणती निष्क्रीय सुरक्षा उपकरणे आहेत?**

AIChE © 2008. सर्व हक्क राखीव. अव्यावसायिक, शैक्षणिक हेतूसाठी वापरण्यास प्रोत्साहन आहे. तथापि CCPS शिवाय अन्य कोणी पुनर्विक्री करण्यास सक्त मनाई आहे. संपर्क : ccps_beacon@aiche.org or २१२.५९१.७३१९

हे बीकॉन सहसा अफ्रीकन, अरेबिक, चिनी, डॅनिश, डच, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, ग्रीक, गुजराती, हिब्रू, हिंदी, हंगेरियन, इंडोनेशियन, इटालियन, जपानी, कोरियन, मालय, मराठी, नॉर्वेजियन, पर्शियन, पोलीश, पोर्तुगीज, रशियन, स्पॅनिश, स्वीडीश, तमिळ, थाई, तेलगू, तुर्की, उर्दू आणि व्हीएतनामी इत्यादी भाषांमध्ये उपलब्ध आहे.

This Beacon is translated in Marathi by Mr. S.K. Gulawani, Maharashtra, India.